दैनिक
लक्ष महाराष्ट्र
रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...
www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com ▶ RNI No.MAHMAR/2019/79184
▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ८७ वा ▶ गुरुवार दि.१ फेब्रुवारी २०२४ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे : ६

खुशखबर... खुशखबर...
खास लोकांच्या आग्रहास्तव
न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे
पार्सल सेवा व रिटर्न बुकिंग उपलब्ध
धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला
स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस
रात्री १०.३० वाजेला

संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896
दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

न्यूज कॉलम

गुरांची वाहतूक; दोघांविरूद्ध गुन्हा

धुळे । मुंबई-आग्रा महामार्गावरील सोनगीर (ता. धुळे) टोलनाक्यानजीक शिरपूरकडून धुळ्याकडे जाणार्या पिक-अप (एमएच १७, एजी ६६२१) वाहनाला पकडण्यात आले. वाहनात पाच गुरांना दोरीने निदर्यपणे कोंबलेले आढळले. पोलिसांनी गुरांची सुटका केली. २९ जानेवारीला दुपारी एकच्या सुमारास ही कारवाई केली. दोन लाखांचे वाहन व २३ हजारांची गुरे असा मुद्देमाल जप्त केला.

आत्महत्येस प्रवृत्त ; पत्नीविरुद्ध गुन्हा

धुळे । पत्नीच्या सततच्या जाचाला कंटाळून पतीने गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबत पत्नीवर धुळे तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला. गोकुळ श्रीराम असे मृत पतीचे नाव आहे. त्यांच्याकडे पत्नीने वेळोवेळी पैशांची मागणी करून खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. मानसिक त्रास दिला. त्या त्रासाला कंटाळून गोकुळ श्रीराम यांनी २६ जानेवारीला गळफासाने आत्महत्या केली. पत्नीने आत्महत्येस प्रवृत्त केले, अशी फिर्याद भाऊ गोपाल श्रावण श्रीराम यांनी दिली.

अट्टल घरफोड्या जेरबंद; ११ गुन्ह्यांमध्ये होता फरार

धुळे । शहरात एकापाठोपाठ एक घरफोड्या करणाऱ्या अट्टल घरफोड्याच्या गंगापूर पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. अटक केलेला संशयित अकरा गुन्ह्यांमध्ये फरार होता. विकास ऊर्फ विक्की सुधाकर पटेकर (रा. संत कबीरनगर, गंगापूर रोड) असे अटक केलेल्या अट्टल घरफोड्याचे नाव आहे. विकास याच्याविरुद्ध चोरी, घरफोडीचे २४ गुन्हे दाखल असून, त्यापैकी ११ गुन्ह्यांमध्ये तो फरार होता.

आम्ही झुंडशाहीने वागत नसून हक्क मागत आहोत: भुजबळांच्या टीकेला जरांगेंचे प्रत्युत्तर

मंडल आयोगास चॅलेंज केले तर ओबीसींचे नुकसान

मुंबई । लक्ष महाराष्ट्र वृत्त

मराठा मुलानी सांगितले की आम्ही मुंबईला जाताना आरक्षण घेऊन येऊ त्याप्रमाणे आम्ही घेऊन आलो आहे. कायद्यामार्फत सगेसोयरे प्रमाणपत्र मिळाले की पुन्हा एक महादिवाळी साजरी केली जाणार आहे. तसेच एक मोठी जाहीर सभा घेतली जाणार आहे. आमच्या ज्या कुणबी नोंदी मिळाल्या त्या चॅलेंज होऊ शकणार नाही. राजकीय आरक्षणा बाबत अद्याप मला कोणी विचारले नाही. तो उद्देश धरून माझे आंदोलन नाही. ज्या सवलती ओबीसी यांना मिळत आहेत, त्या आम्हाला मिळाव्या हीच अपेक्षा आहे. आम्ही झुंडशाहीने वागत नसून हक्क मागत आहोत, असे मनोज जरांगे म्हणाले. जरांगे म्हणाले, मी प्रथम नेतृत्व हातात घेतले नाही मला नेतृत्व नको होते. पण आंदोलन प्रामाणिक केले पाहिजे अशी भावना होती. विनाकारण पैसे गोळा करण्यात मी कधी पडलो नाही. मला राजकारणाचा वारसा नाही. मी शेतकरी कुटुंबातील आहे. येवल्याचा माणूस म्हणाला मी पाचवी शिकलेलो आहे. २९ ऑगस्ट रोजी मी मराठवाडा मधील लोकांना एकत्र करून अडीच लाख लोकांचे आंदोलन केले.

लाठीहल्ला हा सर्वात मोठा डाग

माझ्या गावातील लोकांवर पोलिसांनी अमानुष लाठीमार केला. अनेक जन गंभीर जखमी झाले. शांततेत आमरण उपोषण आंदोलन केल्याने अनेक महिला सहभागी झाल्या होत्या. पोलिस आणि प्रशासन यांनी मला विनंती केल्यावर मी समाजाला सांगितले आणि शांततेत लोक घरी गेले. त्यानंतर पोलिसांनी ज्या प्रकारे लाठीमार, गोळीबार केला त्यामुळे अमानुष प्रकार कधी बघितला नाही. मी १२ दिवस बिना पाणी, अन्न राहू शकतो. उपचार घेतो मी म्हणालो तरी त्यानंतर मोठ्या प्रमाणात पोलिस फोर्स आणून आंतरवलीमध्ये अचानक लाठीमार केला गेला हा सर्वात मोठा डाग आहे.

८ लाख नोंदीबाबत सविस्तर सांगत नाहीत

सरकार मला ज्या ५८ लाख नोंदी मिळाला असे सांगत आहे त्याबाबत सविस्तर माहिती देत नाही. या नोंदी जुन्या आहे पण नव्याने मिळाल्या आहे. कारण ज्यांना नोंदी मिळाल्या ते मला सांगत आहे. आमच्याकडे पुरावा असल्याशिवाय आम्ही बोलत नाही. कोणते चॅलेंज देऊन मला ओबीसी समाजाचे मुलांचे नुकसान करायचे नाही. राजकीय स्वार्थासाठी आरक्षण बाबत चॅलेंज केले जाऊ नये. आम्ही गावात जाऊन छगन भुजबळ यांना समजावून सांगा असे सांगणार आहोत. कारण मंडल आयोगास आम्ही आक्षेप घेतला तर ओबीसी यांचे नुकसान होईल.

हिंमत असेल तर मंडल आयोगाला आव्हान द्या:छगन भुजबळ

झुंडशाहीपुढे नमते घेऊन लाखो लोकांना ओबीसी आरक्षणात बॅकडोअर एंट्री दिली जात आहे. पुन्हा त्यांचे सगेसोयऱ्यांच सुरु झाले आहे. त्यामुळे आम्हाला आमदार, खासदार, प्रशासन आणि कोर्टाकडे दाद मागावी लागणार आहे. लोकशाहीने आम्हाला जे अधिकार दिले आहेत, त्याचा आम्ही वापर करणार आहोत, असे अजित पवार गटाचे मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, मराठा समाजाचे जे माहितीगार आहेत, अभ्यासक आहेत.. ते म्हणतायत की, आम्हाला मराठा म्हणून वेगळे आरक्षण द्या. परंतु सध्या झुंडशाहीपुढे नमते घेऊन निर्णय घेतले जात आहेत. आमच्या आरक्षणाला धक्का लागला जावू नये. ते एका जातीसाठी लढत आहेत, मी मात्र ३७४ जातींसाठी लढत आहे.

दहिवेलनजिक एसटी बसचा अपघात

३० प्रवासी जखमी

साक्री । लक्ष महाराष्ट्र वृत्त

धुळे-सुरत राष्ट्रीय महामार्गावर दहिवेल गावानजिक एसटी बसला चारचाकी वाहनाने हुलकावणी दिली. यामुळे बस चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस अज्ञात वाहनावर जाऊन धडकली. या अपघातात चालक व वाहकासह २० प्रवासी जखमी झाले आहेत. सर्व जखमींना धुळ्यातील श्री भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काल सकाळी एसटी बस (एमएच २०/बीएल ३२०१) नवापूर येथून पुण्याला जाण्यासाठी निघाली होती. दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास सदर बस दहिवेलनजिक आली असता भरधाव चारचाकी वाहनाने बसला हुलकावणी दिली. यामुळे बसचालकाचे नियंत्रण सुटून बस अज्ञात वाहनावर जाऊन धडकली. या अपघातात बसमधील चालक व वाहकासह सुमारे २० प्रवासी जखमी झाले. शिवाय बसचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अपघाताची माहिती मिळताच १०८ क्रमांकावरील रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली होती. रुग्णवाहिकेद्वारे सर्व जखमींना धुळ्यातील हिरे रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी दुपारी उशीरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु होती. या अपघातात जखमी झालेल्यांमध्ये गोवर चौधरी (११) रा.दहिवेल, स्वीटीप्रदीप सुडके रा.कालदा, निकिता सुनिल पवार (२३) रा.चिचपाडी, भिमसिंग (७३), शेख युसुफ शेख दादमिया (७०) रा.औरंगाबाद, भाऊसाहेब भिमराव खरे (४२) रा.टिटाणे, वैशाली भाऊसाहेब खरे (४०), रोहिणी अशोक वसावे (२३) रा. कोळदे, नानाजी रामभाऊ मोरे (५९), रोशनी महेंद्र गावित (२३) वघाडे, सुमित्रा दिनकर गावित (३१) कोळदे, गंगा प्रभू गावित (३०) रा. सोनखेड, नुपूर निलेश गावित (२२) रा.कामोद, रणीलाल भटू गवळे (५०) रा.नवापूर, सिमा राकेश सावळे (३०) रा.ताराबाद, विलास सजन गोसावी (३९) रा.पिंपळनेर, पूजा विकास गोसावी (३६) रा.पिंपळनेर, याभेस गावित (२१) रा.नवापूर, रुतिजा सुशिल गावित (२१), शितल नदेश गावित (२१) रा.नवापूर, दिपाली समधान मोरे (२०) रा.टिटाणे आदींचा समावेश आहे.

कुरिअर वाहन दरोड्यातील ६०० ग्रॅम सोने, ३० किलो चांदी जप्त

नाशिक । इगतपुरी तालुक्यातील मुंढेगाव शिवारात काही दिवसांपूर्वी कुरिअर वाहनावर पडलेल्या दरोड्यातील आणखी ६०० ग्रॅम सोने व ३० किलो चांदी हस्तगत करत आरोपींच्या वाहन चालकास चांदवड येथून अटक करण्यात आली आहे.

मुंबई येथील जय बजरंग कुरिअर सर्व्हिसच्या वाहनावर इगतपुरी तालुक्यातील मुंढेगाव शिवारात पाच ते सहा संशयितांनी दरोडा टाकला होता. या वाहनातून सोने आणि चांदीच्या दागिन्यांची वाहतूक करण्यात येत होती. दरोड्यात साडेचार किलो सोन्याचे दागिने, बिस्कीट आणि १३५ किलो चांदीचे दागिने व विटा याप्रमाणे तीन कोटी ६७ लाख ५५ हजार रुपयांच्या मुद्देमालाची लूट करण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखा आणि घोटी पोलिसांनी आग्रा जिल्ह्यातील खेरागड, इटौरा परिसरातून देवेंद्रसिंग उर्फ करवा परमार, आकाश परमार, माजी सैनिक हुबसिंग ठाकूर, फळ विक्रेता शिवसिंग ठाकूर, माजी सैनिक जहिर खान यांना मागील आठवड्यात ताब्यात घेतले. त्यांच्याकडून २.५ किलो सोन्याचे दागिने आणि ४५ किलो चांदीचे दागिने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

संशयितांना न्यायालयाने नऊ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली होती. दरम्यान, या गुन्ह्यातील तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखा तसेच घोटी पोलिसांचे पथक आग्रा येथे पुन्हा गेले होते. आग्रा येथून पथकाने ५९६ ग्रॅम सोने, २९.७४६ किलो चांदीचे दागिने हस्तगत केले. तसेच गुन्ह्यात वापरलेल्या वाहनाचा चालक नंदकिशोर गारे (४५. रा. चांदवड) याला देखील पोलिसांनी अटक केली आहे.

धुळे येथे शनिवारी निरंकारी संत समागमाचे भव्य आयोजन

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

येथील संत निरंकारी मंडळा तर्फे दिनांक ३ फेब्रुवारी २०२४ (शनिवार) रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत साक्री रोडवरील विद्यावर्धिनी महाविद्यालयाच्या प्रांगणात निरंकारी संत समागमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात होणाऱ्या या आध्यात्मिक सत्संग -प्रवचनाच्या कार्यक्रमास उत्तर महाराष्ट्रातील हजारो भाविक भक्तांची उपस्थिती राहणार आहे. या संत समागमासाठी विविध व्यवस्थांची जय्यत तयारी सुरु आहे.

कार्यक्रमासाठी भव्य स्टेज, सभामंडप व आकर्षक मुख्य प्रवेशव्दार उभारण्यात येत असून,या प्रवेशव्दाराजवळ स्वागत कक्ष, सेवादल कक्ष, ब्रह्मज्ञान प्रदान कक्ष,वैद्यकिय सहाय्यता कक्ष, प्रकाशन स्टॉल, कॅन्टीन, पोलीस मदत कक्ष इ. व्यवस्था करण्यांत येणार आहेत. या सर्व सेवांची जबाबदारी संत निरंकारी सेवादलाचे जळगाव क्षेत्राचे बंधू- भगिनी मोठ्या उत्साहात पार पाडतांना दिसत आहेत.वाहनांच्या पार्किंगसाठी देखील मैदानात व्यवस्था करण्यात आली आहे.

संपूर्ण विश्वात आध्यात्मिक जागृतीसोबतच विश्वबंधुत्व व एकात्मेचा संदेश देणारे निरंकारी मिशन व्दारा घेण्यात येणारे सत्संग सुदीक्षाजी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली होत आहेत. निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज हे या वेळी आध्यात्मिक जागृतीद्वारे मानव एकतेचा संदेश देतील.

महाविद्यालयीन तरुणीचा विवाह मित्राने मोडला : गुन्हा दाखल

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

जखाणे (ता. शिंदखेडा) येथील १७ वर्षे नऊ महिने वय असलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थिनीचा गावातील महाविद्यालयीन तरुणाने मैत्री करून बसमध्ये अश्लील कृत्य केल्याने शिंदखेडा पोलिस ठाण्यात 'पॉक्सो'अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. तरुणीने शिंदखेडा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

ऑक्टोबर २०२२ मध्ये एके दिवशी महाविद्यालयात जात असताना वैभव रवींद्र बेहरे (रा. जखाणे, ता. शिंदखेडा) याने बसमध्ये गळ्यात हात टाकून मोबाईलमध्ये छायाचित्र काढले व ते व्हायरल करण्याची धमकी देत शरीरसंबंध ठेवण्याची मागणी केली. नकार दिला असता त्याने शिवीगाळ केली व लज्जास्पद कृत्य करीत ठार करण्याची धमकी दिली. वैभवच्या त्रासाला कंटाळल्याने शेतातील पिकांवर फवारणीकरिता आणलेले औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला होता. परंतु वेळीच दवाखान्यात नेल्याने जीव वाचला. वार्षिक परीक्षा असताना पुन्हा महाविद्यालयात गेली असताना वैभवने शरीरसंबंधाची मागणी केली. त्यास नकार दिल्याने त्याने डोके भिंतीवर ठोकून ठार करण्याची धमकी दिली.

धुळ्यात धर्मसभेला धुळेकर नागरिकांची गर्दी

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

प्रति अयोध्यानगरीत भव्य धर्मसभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी धुळेकर नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. विशेष म्हणजे या धर्मसभेसाठी अयोध्येत प्राणप्रतिष्ठेप्रसंगी हजेरी लावलेले साधू-संत उपस्थित होते. साधू-संतांचे अनुभव कथन व मार्गदर्शन ऐकण्यासाठी समस्त हिंदू बांधव व भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीरामभक्त अनुप अग्रवाल यांनी पांझरा नदीपात्रात पंचमुखी हनुमान मंदिरालगत अयोध्येतील श्रीराम मंदिराची प्रतिकृती साकारली आहे. सर्व श्रीराम भक्तांना अयोध्येत जावून प्रभू श्रीरामाचे दर्शन घेणे शक्य नाही. त्यामुळे अनुप अग्रवाल यांनी साकारलेली श्रीराम मंदिराची प्रतिकृती धुळ्यातच अयोध्या दर्शनाची अनुभूती देत आहे. ही प्रतिकृती पाहण्यासाठी दररोज हजारो नागरिक या ठिकाणी हजेरी लावत आहेत. इतकेच नव्हे तर या ठिकाणी दररोज महाआरती, भजनसंध्या, श्रीराम गीते असे विविध भक्तीमय कार्यक्रम दिग्गजांच्या उपस्थितीत होत आहेत. महाराष्ट्रभरात गाजलेल्या या दिग्गज कलाकारांच्या कार्यक्रमांसाठी दररोज अलोट गर्दी उसळत आहे. प्रति अयोध्या नगरीत गेल्या दहा दिवसांपासून श्रीराम भक्तीमय वातावरण असून धर्मसभेने या कार्यक्रमांचा समारोप होणार आहे. धुळ्यात भाजप नेते अनुप अग्रवाल यांच्या नेतृत्वात अयोध्या मंदिराची प्रतिकृती तयार करून धुळेकरांसाठी दर्शन सोहळा घडवून आणला आहे.

इंदिरानगर, राणेनगर बोगद्यांची लांबी वाढविण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू : खा. गोडसे

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

इंदिरानगर, राणेनगर, दिपालीनगर, लेखानगर या महामार्ग लगतच्या भागातील वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी बोगद्यांच्या लांबी वाढविण्याच्या कामाची नॅशनल हायवे प्रशासनाकडून निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. इंदिरानगर येथील बोगद्याची लांबी वीस मिटरहून छत्तीस मिटर तर राणेनगर येथील बोगद्याची लांबी सत्तावीस मीटरवरून चौरेचाळीस मीटर इतकी होणार आहे. येत्या तीन महिन्यात निविदा विषयीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होणार असून पुढील दोन वर्षात बोगद्याची लांबी, रुंदी वाढवण्याचे काम पूर्ण होणार असल्याची माहिती खा.हेमंत गोडसे यांनी दिली आहे

राणेनगर आणि इंदिरानगर हे दोन्ही बोगदे नाशिक - मुंबई महामार्गावर आहेत. सिडको आणि नाशिक शहर यांना जोडणारे हे दोनही बोगदे आहेत. आराखडा मंजूर होवून या कामी निधी उपलब्ध होण्यासाठी खा.गोडसे यांनी वेळोवेळी केंद्रीयमंत्री ना.नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला. यातूनच ना.गडकरी यांनी काही महिन्यांपूर्वीच सत्तेचाळीस कोटीच्या निधीला मान्यता दिलेली आहे.

वाहनचालकाच्या खिशातील रोकड बळजबरीने चोरली

सिडको । लक्ष महाराष्ट्र वृत्त

रुग्णालयात गॅस सिलिंडर पोहोचविण्यासाठी घेऊन जाणारे वाहन रस्त्यात अडवून दोघा जणांनी चालकाच्या खिशातील दोन हजार रुपयांची रोकड जबरदस्तीने काढून घेत लूटमार केल्याची घटना अंबड परिसरात घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी संदीप तुकाराम बाविस्कर (रा. सिंहस्थनगर, नाशिक, मूळ राहणार पिलखोड, ता. चाळीसगाव, जि. जळगाव) हे वाहनचालक असून, ते अंबड एमआयडीसीतील पिनॅकल ऑक्सिजन इंडस्ट्रीज कंपनीत काम करतात. दि. ३० दुपारी साडेतीनच्या सुमारास बाविस्कर हे पिनॅकल ऑक्सिजन इंडस्ट्रीजमधून गॅस सिलिंडर भरून सिव्हिल हॉस्पिटल व संदर्भसेवा हॉस्पिटल येथे पोहोचविण्यासाठी एमएच १५ ईजी ९३८० या क्रमांकाच्या आयशर वाहन घेऊन जात होते. त्यांचे वाहन सिम्बॉयोसिस स्कूलसमोर आले असता समोरून मोटारसायकलीवरून दोन अज्ञात इसम आले व आम्हाला कट का मारला? यावरून कुरापत काढून गाडी थांबविण्यास सांगितले. त्यानंतर चालकाला गाडीतून खाली ओढत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

धुळ्यात ३ फेब्रुवारीला 'यदाकदाचित रिटर्न्स' या नाटकाचा प्रयोग

तिकिटासोबत बझफ्लिक्सचे एका वर्षाचे सबस्क्रीप्शन मिळणार मोफत

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

दि.३ फेब्रुवारी रोजी धुळ्यात हिरे भवनला 'यदा कदाचित रिटर्न्स' हे नाटक येत असून नाट्यरसीकांनी नाटकाचं तिकीट घेतल्यानंतर बझफ्लिक्सचे एका वर्षाचे सबस्क्रीप्शन मोफत असणार आहे. हा प्रयोग बझफ्लिक्स एन्टरटेन्टमेंट चॅनलच्या प्रमोशनसाठी आयोजित करण्यात आला असल्याची माहिती चॅनलचे सीईओ अक्षय ठाकूर यांनी बुधवार दिनांक ३१ जानेवारी रोजी पत्रकार परिषदेत दिली. कोणत्याही प्रकारचे अश्लील, आक्षेपार्ह कंटेन्ट नसलेले आणि संपूर्ण कुटूंबासाठी असलेले बझफ्लिक्स एन्टरटेन्टमेंट चॅनलच्या माध्यमातून धुळ्याच्या कलावंतांनी भरारी घेतली आहे.

अक्षय ठाकुर हे बझफ्लिक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी असून ते मुळचे धुळ्याचे आहेत. मुंबईत हिंदी चित्रपट, नाट्यसृष्टी गाजविणार्या अक्षय यांनी धुळ्याची ओळख जागतीक पातळीवर नेण्यासाठी धुळ्यातून बझफ्लिक्सचा शुभारंभ केला आहे. धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेला बझफ्लिक्सचे सीईओ अक्षय ठाकुर, मुख्य सर्जनशिल अधिकारी रुपेश प्रकाश, किशोर नामदेव ठाकुर, धुळे जिल्हा नाट्य परिषदेचे प्रतिनिधी सुजय सुरेश भालेराव, राहुल बागुल आदी उपस्थित होते. या पत्रकार परिषदेला बझफ्लिक्सबद्दल माहिती देताना अक्षय ठाकुर म्हणाले की, संपूर्ण कुटूंबासाठी हा ओटीटी प्लॅटफॉम असून बझफ्लिक्सच्या माध्यमातून वेबसीरिज, फिल्म्स, कार्टून रसीकांना पाहता येतील. दुबई येथे राहणारे समिर शिनॉय हे या चॅनलचे फाउंडर आहेत. दि.३ फेब्रुवारी रोजी धुळ्यात हिरे भवनला 'यदा कदाचित रिटर्न्स' हे नाटक येत असून नाट्यरसीकांनी नाटकाचं तिकीट घेतल्यानंतर बझफ्लिक्सचे एका वर्षाचे सबस्क्रीप्शन मोफत असणार आहे. भारतासह ७ देशात हे चॅनल दिसणार आहे. बझफ्लिक्सच्या माध्यमातून आम्ही दोन वेबसिरीज बनविल्या आहेत. सध्या हिंदी भाषेतील कार्यक्रम या चॅनलवर दाखविण्यात येत आहेत. लवकरच प्रादेशिक भाषांमधील नाटकं, सिरीज दाखविण्यात येतील. धुळ्यातील स्थानिक कलावंतांना देखील आम्ही प्राधान्य देवू. त्याबरोबरच धुळे आणि जवळपासची लोकेशन्स शुटींगसाठी वापरणार आहोत. त्यातुन धुळ्याची ओळख सर्वदुर होईल. बझफ्लिक्सचे एका वर्षाच्या सबस्क्रिप्शनसाठी ४०३ रुपये रसिकांना मोजावे लागतील असेही ते म्हणाले. नाट्य परिषदेचे प्रतिनिधी सुजय भालेराव म्हणाले की, खुप वर्षानंतर धुळ्यात नाटक येत आहे. धुळेकरांनी साथ द्यावी.

'इंडिया' आघाडी धोक्यात

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपची विचारसरणी देशात हिंसाचार आणि द्वेष पसरवित आहे, ही टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी आधीही करत होते, आताच्या 'न्याय यात्रे'त सुद्धा करत आहेत; पण त्यांचे म्हणणे मतदारांनी मान्य करण्यासाठी काँग्रेस कोणत्या प्रकारची कृतिशीलता दाखविणार, हा खरा प्रश्न!

प्रत्येक निवडणूक प्रतिष्ठेची करायची, हे भाजपचे तंत्र आजचे नाही. चंडीगढच्या महापौर पदासाठी झालेली निवडणूक हे त्याचे ताजे उदाहरण. तेथे भाजपला बहुमत नसताना देखील त्या पक्षाचे मनोज सोनकर महापौरपदी विजयी झाले. विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीने एकत्र लढविलेली ही पहिली निवडणूक. आघाडीला जोरदार झटका बसला आहे. काँग्रेस आणि आम आदमी पक्षाच्या वीस मतांपैकी आठ मते रद्द ठरविण्यात आल्याने चंडीगढ महापालिकेत भाजपचा महापौर होऊ शकला! महापौरपदाच्या निवडणुकीत भाजपने ही पातळी गाठली, मग लोकसभेला काय होईल? अशी तोफ डागत दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे संस्थापक अरविंद केजरीवाल यांनी न्यायालयात दाद मागण्याची भूमिका जाहीर केली. एकत्र येत भाजपविरुद्ध लढणे ही विरोधकांची अपरिहार्यता आहे. त्यांच्या आघाडीचे नाव 'इंडिया' ठरले तेव्हापासून या आघाडीला कोंडीत पकडण्याची एकही संधी भाजपने चुकवली नाही. दुसर्या बाजूला, इंडिया आघाडीचे घटक पक्ष आपल्या विधानांनी आणि कृतीने संधीच संधी देत राहिले आहेत! आघाडीची कल्पना ज्या नितीश कुमार यांची, तेच आता आघाडीत नाहीत. त्यांच्या बरोबरीने आघाडीबद्दल उत्साह दाखविणार्या ममता बॅनर्जी पश्चिम बंगालमधील जागा वाटपाचा मुद्दा येताच आघाडीपासून फारकत घेण्याचे जाहीरपणे सांगून मोकळ्या होतात. विरोधकांनी एकत्र लढून भाजपचा पराभव करावा ही त्यांची अपेक्षा आहे, मात्र इंडिया आघाडी पश्चिम बंगाल वगळता अन्य सर्वत्र कार्यरत रहावी, ही अपेक्षा सोडण्यास त्या तयार नाहीत आणि तयार होणारही नाहीत. अरविंद केजरीवाल यांना इंडिया आघाडी पंजाब आणि दिल्ली सोडून अन्यत्र चालणार आहे. हे एक दिलाने एकत्र येणे नव्हे. ते ममता, केजरीवाल यांना ठाऊक आहे, पण आघाडीपेक्षा आपापले पक्ष त्यांना अधिक महत्त्वाचे वाटतात.

राजकीय वास्तव कसे बदलणार ?

चंडीगढमधील पराभव झोंबल्यावर केजरीवाल यांची प्रतिक्रिया कितीही तिखट असली तरी आजचे राजकीय वास्तव त्यातून बदलण्याची शक्यता शून्य. लोकसभेत भाजपने पश्चिम बंगालमध्ये यश मिळविल्यावर त्या यशाची पुनरावृत्ती पक्षाला विधानसभा निवडणुकीत करता आली नाही. ममतांनी राज्य राखले. मात्र, डाव्या पक्षांनी त्या निवडणुकीत किमान सक्रियता दाखवून भाजपला रोखण्यात भूमिका बजावली, हे ममता विसरल्या. आता हट्ट कायम ठेवून त्यांनी इंडिया आघाडीतून अंग काढून घेतले तर भाजपला फायदा होणार आहे. मागील लोकसभेसाठी तृणमूल, डावे पक्ष, काँग्रेस स्वतंत्रपणे लढले होते. मत विभागणीचा फायदा होऊन भाजपने ४२ पैकी १८ जागांवर विजय मिळविला होता. आपल्या एकेकाळच्या बालेकिल्ल्यात डाव्या पक्षांना एकही जागा जिंकता आली नव्हती. आधी नितीशकुमार यांनी आघाडीला झटका दिला, ममतांकडून झटका मिळणार नाही, असे आज तरी निश्चितपणे सांगता येणार नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपची विचारसरणी देशात हिंसाचार आणि द्वेष पसरवित आहे, ही टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी आधीही करत होते, आताच्या 'न्याय यात्रे'त सुद्धा करत आहेत; पण त्यांचे म्हणणे मतदारांनी मान्य करण्यासाठी काँग्रेस कोणत्या प्रकारची कृतिशीलता दाखविणार, हा खरा प्रश्न! 'भारत जोडो' यात्रेच्या आधीच्या टप्प्याला मिळालेला प्रतिसाद चांगला होता. त्याचा फायदा उठविण्यात काँग्रेस पक्षाला अपयश आले, हे अलीकडेच झालेल्या विधानसभा निवडणुकांनी दाखवून दिले. राजकारणात प्रत्येक शक्यता जिवंत असते. अशावेळी बेरजेचे राजकारण घडो ना घडो, किमान राजकीय नेत्यांची भाषा तरी सर्वांना सामावून घेण्याचा संदेश देणारी असली पाहिजे. 'आम्हाला नितीश कुमार यांची गरज नाही', असे विधान राहुल गांधी यांनी केले. वारंवार भूमिका बदलणार्या आणि सहकारी पक्षांचा विश्वासघात करणार्या नितीश कुमारांबद्दल त्राग्याने बोलणे समजून घेता आले, तरी ते औचित्याचे नव्हते. इंडिया आघाडी संकटात सापडली आहे. आपल्याच नेत्यांच्या भूमिकांमुळे गोंधळून गेली आहे. यातून जाणारा नकारात्मक संदेश रोखण्यात इंडिया आघाडी किती यशस्वी ठरते हे पाहावे लागेल.

द स्टार्ट-अप वर्ल्ड

जवळजवळ ९०% स्टार्टअप्स (उद्योग) सुरुवातीच्या पहिल्या काही वर्षांतच अयशस्वी होतात. यशस्वी स्टार्टअप्स काय आहेत? स्टार्टअपसाठी कल्पना कोठे मिळते? एखादी व्यक्ती उद्योग जगतात यशस्वी कशी बनते. हे प्रत्येक तरुणाच्या मनात असणारे प्रश्न आहेत. दुर्दैवाने, ७०% ते ९०% किंवा त्याहूनही जास्त स्टार्टअप्स प्रदर्शनाच्या पहिल्या काही वर्षांतच अपयशी ठरतात. यशस्वी स्टार्टअप तयार करणे हे अत्यंत आव्हानात्मक आहे. प्रत्येक दिवस नवीन आव्हाने आणि नवीन गंभीर प्रश्न घेऊन येतो. उद्योजकांनी ह्या सर्व बाबींवर लक्ष ठेवून व्यवसायात उतरती कळा लागू नये यासाठी प्रदर्शनाच्या अकार्यक्षमतेवर लक्ष ठेवले पाहिजे.

यशस्वी स्टार्टअप कशामुळे होते?

१ उत्कृष्ट स्टार्टअप्स त्यांच्या ग्राहकांच्या गरजांवर लक्ष केंद्रित करते.

व्यवसाय म्हणून, तुम्ही ग्राहकांशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. बऱ्याच ग्राहकांना त्यांनी खरेदी केलेल्या सेवा किंवा उत्पादनामध्ये समाधानी व्हायचे असते आणि ते नसल्यास, ते शेवटी दुसऱ्या विक्रेत्यांकडे जातात ज्यामुळे त्यांना समाधान मिळते. उत्तम स्टार्टअप्सना हे माहित आहे आणि ते त्यांचे ग्राहक आनंदी आहेत याची खात्री करण्यासाठी ते नेहमीच सर्वोत्तम प्रयत्न करतात.

यशस्वी व्यावसायिक जाणतात की ग्राहकाकडे वैध इनपुट, मागण्या आणि अभिप्राय असतात त्यामुळे आपल्या व्यवसायात बदल करून वाढ वृद्धी होऊ शकते. त्यासाठी उत्तम स्टार्टअप्स सेवा किंवा वस्तू पुरवठादार म्हणून सर्वोत्तम संभाव्य सेवा देण्यासाठी कठोर परिश्रम करतात. ग्राहकाच्या गरजेनुसार संगणक प्रणालीद्वारे ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यावर भर दिला गेला पाहिजे. त्याबद्दल ग्राहकांशी बोलून संगणक तंत्रज्ञानाबद्दल जागरूकता करुन नवनवीन संशोधन प्रणालींवरती ग्राहकांना सेवा पुरवल्या गेल्या पाहिजेत.

२ यशस्वी स्टार्टअप्स सतत नावीन्य आणि सुधारणेवरती भर देतात

यशस्वी स्टार्टअप नेहमी नवनवीन संशोधनावरती भर देतात. होय नक्कीच जर का ह्या स्पर्धेच्या जगात आपले कायम स्थान तर नेहमी परिस्थिती नुसार व ग्राहकांच्या गरजेनुसार स्टार्टअप्सनी बदल घडवायला हवेत,आणि जर व्यवसायावर सकारात्मक परिणाम होत असेल तर ते नवीन गोष्टी करून पाहण्यास काही एक हरकत नसेल.

उदाहरणार्थ, उत्तम स्टार्टअप्स डिजिटल ट्रान्सफॉर्मेशनमध्ये गुंतवणूक करत असतात. डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन म्हणजे तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक करणे जे तुमच्या प्रक्रिया आणि सेवा डिजिटली प्रवेशयोग्य बनवेल. अशा प्रकारे, कर्मचाऱ्यांना ऑनलाइन काम करण्याच्या कार्यक्षमतेचा अनुभव येतो आणि ग्राहकांना तुमच्यापर्यंत पोहोचण्यासाठी अधिक पर्याय मिळतात. हे यशस्वी स्टार्टअप्सना त्यांच्या उद्योगात ने मानाचे स्थान टिकवून ठेवण्यास मदत करते.

३ यशस्वी स्टार्टअप्स स्पष्ट दृष्टी स्थापित करतात.

स्टार्टअप्सना त्यांना काय साध्य करायचे आहे याची स्पष्ट दृष्टी असणे आवश्यक आहे. त्याची सुरुवात फक्त व्हिजन स्टेटमेंटने होऊ शकते. व्हिजन स्टेटमेंट म्हणजे व्यवसायाच्या उद्दिष्टाची घोषणा आणि ग्राहकांचे समाधान राखून ठेवन्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न होय. व्हिजन स्टेटमेंट स्टार्टअप्सना लक्ष केंद्रित करण्यात आणि कंपनीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एकत्र काम करण्यास मदत करते. व्हिजन स्टेटमेंट शिवाय स्टार्टअप कधीही यशस्वी नाही होऊ शकत ह्यात दुमत नाही.

४ यशस्वी स्टार्टअप्स एक उत्तम कर्मचारी संघ तयार करण्यासाठी गुंतवणूक करतात.

प्रत्येक यशस्वी स्टार्टअपच्या मागे एक जबरदस्त एकत्रित संघ असतो. प्रतिभावान लोकांना योग्यरित्या संरेखित केल्याशिवाय आणि उत्कृष्टतेसाठी वचनबद्ध असल्याशिवाय स्टार्टअप यशस्वी होऊ शकत नाही. अशाप्रकारे, स्टार्टअप्सनी उत्कृष्ट आणि कंपनीच्या व्हिजन स्टेटमेंटसाठी समर्पित उत्कृष्ट कर्मचारी काळजीपूर्वक निवडणे आवश्यक आहे.

५ उत्कृष्ट स्टार्टअप्स परिवर्तनशील असतात.

जर कोणतीही गोष्ट व्हिजन स्टेटमेंट नुसार होत नसेल तर स्टार्टअप्सने पर्यायी मार्ग शोधणे आवश्यक आहे. उत्कृष्ट स्टार्टअप्स कधीही नवीन गोष्टी करण्याचा प्रयत्न करण्यास किंवा जोखीम घेण्यास घाबरू शकत नाहीत. ही लवचिकता उत्तम स्टार्टअप्सना कंपनीला यश मिळवण्यासाठी मुख्य स्थान देण्यास आणि बदल करण्यास मदत करते.

डॉ. अमोल पोतगंटवार,
प्राध्यापक, संदीप इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजी अँड रीसर्च सेंटर, नाशिक

उजतखऊ-१९ साथीच्या रोगाच्या प्रारंभाच्या काळात, बहुतेक व्यवसायांना दूरस्थपणे (ऑनलाईन) ऑपरेट करण्यास भाग पाडले गेले. या परिस्थितीने कोणत्या स्टार्टअप्सकडे साथीच्या रोगाशी जुळवून घेण्यासाठी आणि जगण्यासाठी पर्यायी मार्ग आहे तेच व्यवसाय मार्केट मध्ये स्वतःचा वेगळा ठसा उमटून उभे राहिलेत ह्यात दुमत नाही. व्यवसायात लवचिकता महत्वाची आहे! स्टार्टअप्सनी संभाव्य धोके शोधले पाहिजेत आणि त्यावर कशा प्रकारे मात करता येईल ह्याकढे योग्य ते लक्ष दिले गेले पाहीजे .

६ उत्तम स्टार्टअप्समध्ये कामाची नैतिकता सर्वोपरि आहे.

उत्तम स्टार्टअप्स सर्व बाबींमध्ये कामाची नैतिकता समजून घेतात आणि त्याची अंमलबजावणी करतात ग्राहकांच्या समस्या सोडवण्यापासून ते समाधान होईपर्यंत ह्यावर लक्ष केंद्रित असते. सुरुवातीच्या टप्प्यातील कंपन्यांनी व्यवसाय यशस्वी होण्यासाठी आवश्यक इन्व्हेस्टमेंट आणि कठोर परिश्रम घेण्यास तयार असणे आवश्यक आहे.

७ उत्तम स्टार्टअप्स संबंधित राहतात.

उत्कृष्ट स्टार्टअप्स त्यांच्या मर्यादेमध्ये सुसंगत राहून, सीमांना पुढे ढकलत राहून, नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून आणि महिन्याभरात विक्रीची उद्दिष्टे पूर्ण करून उद्योगाच्या ट्रेंडशी अद्ययावत राहून त्यांच्या स्पर्धेसमोर टिकून राहतात ! लक्षात ठेवा, उत्तम स्टार्टअप त्यांच्या चुकांमधून शिकतात जेणेकरून ते भविष्यात त्या पुन्हा होऊ नयेत.

संभाव्य स्टार्टअपसाठी कल्पना कोणत्या आहेत? तुम्हाला ते आरोग्य, हरित ऊर्जा, अन्न, पर्यटन, वित्त, शिक्षण, एआय, एमएल, सायबर सुरक्षा किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात सापडतील. आपण आरोग्य क्षेत्रातील तज्ञांसाठी एक टेलिमेडिसिन प्लॅटफॉर्म तयार करू शकतो जे रुग्णांना व्हिडिओ समुपदेशनाद्वारे विशेष डॉक्टरांशी जोडते किंवा एक सॉफ्टवेअर विकसित करू शकतो जे आरोग्य सेवा प्रदात्यांना उपचार परिणाम सुधारण्यासाठी आणि खर्च कमी करण्यासाठी रुग्ण डेटाचे विश्लेषण करण्यास मदत करेल किंवा मानसिक आरोग्य समर्थन, थेरपी ध्यान यासाठी प्स तयार करण्यास मदत करेल.

ग्रीनटेक क्षेत्रात कोणीही सौर, पवन किंवा जलविद्युत उर्जे तील नावीन्यपूर्णतेवर लक्ष केंद्रित करू शकतो किंवा प्रगत पुनर्वापराचे साहित्य विकसित करू शकतो किंवा दैनंदिन उत्पादनांसाठी शाश्वत पर्याय तयार करू शकतो. शिक्षण क्षेत्रातही नवनवीन बदल पाहावयास मिळत आहेत. ऑनलाइन लर्निंग प्लॅटफॉर्म विकसित करणे, वैयक्तिकृत शिक्षणासाठी एआय, एमएल शक्तीवर चालणारी ऍप्स विकसित करणे, ई-कॉमर्स आणि रिटेल स्पेसमध्ये, अत्यावश्यक उत्पादनांसाठी किंवा पर्यावरणपूरक वस्तूंसाठी प्स विकसित करणे, उत्पादने शोधण्यात ग्राहकांना मदत करणारे चॅटबॉट्स, व्हर्च्यूअल कपड्यांसाठी प्स ह्या सर्व नवीन स्टार्टअप्स साठी उत्कृष्ट कल्पना आहेत.

अन्न आणि पेय उद्योगांमध्ये सुद्धा काही अनोख्या उत्कृष्ट स्टार्टअप्स कल्पना होऊ शकतात, जसे की मांस आणि दुग्धजन्य पदार्थांसाठी नाविन्यपूर्ण वनस्पती आधारित पर्यावरणपुरक पर्याय तयार करणे, अन्न वितरणासाठी स्वायत्त वितरण रोबोट्स किंवा ड्रोन विकसित करणे, आहार नियोजन आणि आरोग्यावर वैयक्तिक लक्ष केंद्रित असणारी ऐआय ऍप्स विकसित करणे ह्या देखील नवीन स्टार्टअप्स साठी उत्कृष्ट कल्पना आहेत.

एआय आणि मशीन लर्निंग देखील लहान व्यवसायांना डेटा विश्लेषण, ग्राहक समर्थन किंवा विपणन, अचूक शेतीसाठी उपाय सुचविणे, पीक निरीक्षण किंवा कीटक नियंत्रण आणि प्रगत नैसर्गिक भाषेच्या विश्लेषणासह व्हर्टच्युअल सहाय्यक तयार करण्यासाठी मदत करण्यासाठी एआय, एमएल समर्थित साधने विकसित करण्याच्या संधी देतात.

स्टार्टअप्समध्ये यश मिळवणे आव्हानात्मक असेल पण ते अशक्यही नाही. स्टार्टअप्स जे त्यांच्या बाजारपेठेचे सखोल संशोधन करतात, ग्राहकांच्या अभिप्रायाच्या आधारे त्यांच्या उत्पादनांवर आवश्यक ते बदल करतात आणि सतत ग्राहकांना कशा प्रकारे नवनवीन उत्पादने देता येतील ह्यावर लक्ष केंद्रित करतात तेच स्टार्टअप्स यशस्वी होतील ह्यात दुमत नाही.

स्वतःशी प्रामाणिक रहा - संत राजिंदर सिंह जी महाराज

सत्यता किंवा खरेपणा हा आत्म्याचा एक दिव्य गुण आहे. तसे पाहिले तर आत्मा सत्याच्या मार्गावर चालतो परंतु मन धोकेबाजी व खोटेपणाचा खेळ खेळते. अध्यात्मिक उन्नतीकरिता आपल्याला आत्म्यास जाणावे लागेल. यासाठी आपणास सत्य हा सद्गुण धारण करावा लागेल.

आपण असे समजतो की, इतरांपासून स्वतःची कृती लपवू शकतो परंतु आपण परमात्म्या पासून आणि आपल्या आत्म्यापासून काहीच लपवू शकत नाही. आपणास आपल्या कर्माचे फळ भोगावे लागते. प्रामाणिकपणा हा आत्म्याचा गुण आहे. ज्यावेळी आपल्याला निवड करायची असते की, आपण प्रामाणिक रहावे किंवा बेईमान बनावे, त्यावेळी आपण आत्म्याचे म्हणणे किंवा मनाचे म्हणणे ऐकू शकतो. मन आपणास बेइमानी कडे घेऊन जाते आणि त्यासाठी आपणास ते अनेक सबबी सांगते. याकरिता मनाकडे हजारो तर्क असतात की, आपणास खोटे का बोलायचे आहे, धोका का द्यावा किंवा चोरी का करावी परंतु आत्मा केवळ प्रामाणिकपणा जाणतो.

जर आपण अध्यात्मिक रुपाने प्रगती करू इच्छित असू तर आपणास आत्मिक रूपाला जास्तीत जास्त जाणले पाहिजे. आपल्या वास्तविक अवस्थेच्या जवळ येण्याकरिता



म्हणजेच आपल्या आंतरिक आत्म्याच्या जवळ येण्याचा अर्थ आहे - आपण आपल्या कार्य व्यवहारात प्रामाणिक व्हावे. छोट्या-मोठ्या, खोटेपणाने व बेइमानी ने आपल्या अध्यात्मिक प्रगतीमध्ये अटकाव करणे योग्य आहे का? धोकेबाजी ने थोडे धन कमावून आपला आत्मा व परमात्म्याच्या मिलनात बाधा निर्माण करणे आणि आपल्या अंतरी जे अध्यात्मिक धन आहे त्यापासून वंचित रहाणे उचित आहे का? अंतरीचे खजिने शाश्वत आहेत आणि ते आपल्याबरोबर सदैव राहतात.

शब्दकोडे-३०८



आडवे शब्द :

१. परत परत ३. सतत पक्ष बदलणारे पुढारी ८. पातळ खांब १०. चांदणी ११. सुसर १२. अफवा १३. छोटी ताटली १६. शुभ्र, पांढरा १७. मनातील ओळखणारा १८. अभिनेता १९. कागदावरील स्तंभ २१. --- जाधव- पहिला भारतीय ऑलिंपिक कुस्तीपटू २३. प्रहार २५. क्षणात संपणारे २९. जय-पराजय ३१. चालू वा गत काळ ३२. गुलाम ३३. सम तल ३५. सौंदर्यवान ३८. --- युनूस, वसिम अक्रमचा जोडीदार पाकिस्तानी गोलंदाज ४०. घाईघाईने ४२. करुणा, कीव ४४. परीक्षा रत्नाची इ. ४६. फ रसत ४७. धोबी ४९. संघाचा प्रमुख ५०. वाघाची मावशी ५२. घर ५४. एक सोडून एक ५५. एक रंगीत कंदमूळ ५६. वेल ५८. बाराचा समूह (इंग्रजी) ५९. नकला करणारा ६१. पद्धत ६२. बोबडी वळणे ६३. दुर्बोध, कर्नाटकी ६५. गोडी, आवड ६७. तलवार ७०. वैमानिक ७३. पुरुष व स्त्री ७५. मनाचा ओढा ७६. कूस (हिंदी) ७८. बदलणे ७९. जमीनदोस्त ८१. एक मंगल वाद्य ८२. मोठ्या फुगीर शेपटीचा छोटा प्राणी ८३. खर्चात कपात

उभे शब्द :

१. प्राचीन २. तुकारामांना सदेह वैकुंठाला नेणारे विमान ३. प्रार्थना ४. वनवास भोगणारे दोन दशरथपुत्र ५. नंतर ६. उष्ण ७. राजाची मुलगी ८. संधी ९. शिर्डीचे संत १२. अंदाज, कयास १४. कसा, चंची १५. कोवळा अंकुर २०. चिंता २२. ऐटबाज २४. विहिरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन, तोच तो दिनक्रम २६. तोडणे-मोडणे २७. दुलई २८. ताब्यात ठेवता न येणारे ३०. झाड ३४. पदर ३६. बिल्ला ३७. व्यर्थ ३९. काखेत होणारा गळू ४१. थंड ४३. रंग ४४. झाडाभोवतीचा कट्टा ४५. पुष्कळ ४६. सूट ४८. जन्म ४९. टाळ्यांचा आवाज ५१. अटीची भाषा ५३. गिळंकृत करणे, जबरदस्तीने बळकावणे ५४. चेहरा ५७. घाई, त्वरा ६०. पूर्ण बदल ६३. आजच्या आधीचा दिव ६४. चिवचिवाट ६६. उंचसखल नसलेले ६८. विष्णुपत्नी ६९. चामड्याचा दोर ७१. टिंगल ७२. इलाज ७३. नटणारा ७४. मोठी बहीण ७५. खबदाड ७७. वर्ष (ग्रामीण) ७९. कोंभाची लवलव हिचे मार्दव सांगते! ८०. जिवलग मित्र

शब्दकोडे-३०७ चे उत्तर

आडवे उत्तर
१.श्याम ३.बासरी ५.सुदर्शन चक्र ९.मारा ११.हिम १३.मदार १४.यजमान १६.जलाशय १७.सुरमा १८.विरह २०.वरण २१.वारा २२.मार्ग २४.डाकू २६.राजमहल २८.बालक ३०.पदार्पण ३३.आडकाठी ३५.ताण ३६.किल्मिष ३७.खरवस ३९.सुतार ४१.सरकी ४२.जोडा ४३.चुरस ४४.धार ४७.जंगी ४८.सट्टा ४९.तपोवन ५०.हतभागी ५२.तग ५३.सय ५४.सौम्य ५६.कर ५७.आगळीक ५९.साजण ६१.डाक ६२.माता ६३.अथर्व ६४.खतावणी ६६.डेअरी ६९.सुगम ७०.रस ७१.ओ ७२.वचक ७४.डिकी ७६.गरीब ७७.माका ७९.शचि ८०.तरबेज ८१.लीलया ८२.ओकारी ८३.तरंग

उभे उत्तर
२.महिला ४.सखी ५.सुदामा ६.दर ७.नकार ८.क्रय ९.मामा १०.रानटी १२.मशक १३.मरण १५.जव १६.जबडा १७.सुरभी १८.विराम १९.हमाल २१.वाजवी २३.हलका २५.कूप २५अ.दर्पण २७.हाजिर २८.बाड २९.कठीण समय येता ३१.दातार ३२.वाल्मिकी ३३.आस ३४.वसुधा ३६.किरटा ३७.खडाजंगी ३८.वसा ४०.तारतम्य ४३.चुट्टा ४५.अवनी ४६.शतक ४८.सगळीकडे ५१.भार ५२.तगडा ५४.सौर ५५.बजरंगबली ५८.अथवा ६०.दिवस ६२.मारीच ६५.तारका ६७.अवचित ६८.तडीत ६९.सुरी ७३.कजाग ७५.कीर ७६.गज ७७.माया ७८.हेका

रिलेशनशिपमध्ये असणाऱ्या आयांनो स्वतःच्या मुलांना वेळ द्या!

कारण काहीही असो, महिला असो की पुरुष आजकाल बहुतांश लोक विवाहबाह्य संबंधात अडकलेले आहेत. आजच्या लेखाच्या मार्फत महिलांना एकच गोष्ट प्रकर्षाने सांगायची आहे ती म्हणजे आपल्या लग्नानंतरच्या रिलेशनशिपचा मुलांवर कितपत, कसा आणि काय परिणाम होतोय, हे पहिले लक्षात घ्या. आपल्याकडे मुलांसाठी समुपदेशनला आलेल्या, स्वतःचं अफेअर असणाऱ्या आणि त्यातून आता त्रासातून जाणाऱ्या, मुलांचं नुकसान झालेल्या अशा महिलांशी चर्चा करून काही गोष्टी जाणवल्या. त्यांच्या मुलांच्या बाबतीत जे काही घडलं आहे, घडत आहे त्यावर मार्गदर्शन घ्यायला वेळोवेळी त्यांच्याकडून सांगितल्या गेलेल्या समस्यांचा लेखाजोखा आपण या लेखाद्वारे मांडणार आहोत. अनेक महिला हे विसरतात की, पुरुष जेव्हा विवाहबाह्य संबंध ठेवतात, तेव्हा त्यांच्या मुलांकडे लक्ष द्यायला, हवं-नको पाहायला, त्यांचा अभ्यास घ्यायला, आजारपणात मुलांची काळजी घ्यायला, त्यांना वेळ द्यायला त्यांची पत्नी असते. बायको म्हणून आणि त्याच्या मुलांची आई म्हणून ती मुलांप्रति असलेल्या सर्व जबाबदाऱ्या आणि कर्तव्य चोख पार पाडत असते. महिला मात्र जेव्हा अशा संबंधात अडकते, तेव्हा तिच्या माघारी मुलांसाठी तिच्या घरात कोण आहे? हा महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो. अफेअर असतानासुद्धा नवऱ्यासोबत राहणारी महिला असेल, तर निदान बाप म्हणून मुलांना आईच्या अनुपस्तीथीमध्ये थोडंफार सांभाळून घेऊ शकतो. रिलेशनशिपमध्ये असणारी महिला एकल असेल म्हणजेच विधवा अथवा घटस्फोटिता अथवा नवऱ्यापासून लांब राहणारी असेल, तर मुलांची सर्वांगीण जबाबदारी तिच्यावर असते. अशा वेळी अनेकदा ती मुलांना घेऊन स्वतंत्र राहत असते. खूपदा तिच्यासोबत राहायला इतर कोणी वडिलधारी माणसं अथवा नातेवाईक उपलब्ध नसतात. समुपदेशनला आलेल्या काही महिलांनी ज्या व्यथा सांगितल्या, त्यांना होणारा पच्छाताप अथवा मुलांबाबत निर्माण झालेली विचित्र परिस्थिती सांगितली, तेव्हा एखादी स्त्री परपुरुषाच्या प्रेमात किती आंधळी होऊ शकते आणि त्यासाठी अगदी स्वतःच्या पोटच्या मुलांनासुद्धा वाऱ्यावर सोडू शकते आणि त्याचे किती भयानक परिणाम तिला तसेच तिच्या मुलांना भोगावे लागू शकतात, हे ऐकून धक्का बसतो. जास्त करून एकल महिलांना एकहाती मुलांना सांभाळणं, पालनपोषण करणं जिकिरीचं असते. त्यातून अशा महिला स्वतःला रिलेशनशिपमध्ये प्रमाणापेक्षा जास्त गुंतवून घेतात. कारण कुठेतरी नवऱ्याची कमतरता भरून निघते आहे, हा त्यांचा समज असतो. त्या पुरुषाच्या भावना, मन, मर्जी, अपेक्षा सांभाळण्याच्या नादात मुलांच्या प्रति स्वतःच आई म्हणून असलेलं कर्तव्य त्या पूर्णपणे विसरतात. **क्रमशः**

- फॅमिली काऊन्सलिंग: मीनाक्षी जगदाळे

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

न्यूज कॉलम

मालकाचे ३ लाख लंपास करणाऱ्या चोरट्यास अटक

नाशिक । मालकाच्या चारचाकीतून तीन लाखांची रोख रक्कम लंपास केल्याचा प्रकार २३ जानेवारीला घडला होता. संशयित प्रशांत गवळी यास भद्रकाली पोलिसांनी हिंगोली येथून अटक केले. त्याच्याकडून १ लाख ८२ हजार ५०० चा मुद्देमाल हस्तगत केला. गंगापूर रोड येथील गणपत सुखदेव हडपे जिल्हा परिषदेत कामानिमित्त आले असता चालकाने रक्कम लंपास केली होती. वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र, निरीक्षक संतोष नरुटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सहाय्यक निरीक्षक सत्यवान पवार, तपास अधिकारी उपनिरीक्षक रमेश शिंदे, नरेंद्र जाधव, संदीप आहेर जालना येथे दाखल झाले. तेथूनही तो निसटला. संशयित हिंगोली येथे असल्याची माहिती तांत्रिक पद्धतीने मिळाली. पथकाने हिंगोली गाठत त्यास शिताफीने अटक केली.

सार्वजनिक वाचनालयाचा कार्यक्षम खासदार पुरस्कार ना. डॉ. पवार, कार्यक्षम आमदार पुरस्कार ना.सुधीर मुनगंटीवार यांना प्रदान

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

१८३ वर्षाची परंपरा असलेल्या नाशिकच्या सार्वजनिक वाचनालय या संस्थेद्वारे माजी आमदार आणि पत्रकार कैलासवासी माधवराव लिमये यांच्या स्मृती प्रित्यर्थ देण्यात येणाऱ्या कार्यक्षम खासदार आणि कार्यक्षम आमदार पुरस्कार स्वामी समर्थ सेवा केंद्राचे परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या हस्ते खासदार आणि केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार आणि राज्याचे वनमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांना प्रदान करण्यात आले. यावेळी डॉ. भारती पवार यांनी वाचनालयाने विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका तयार करावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांनी पुरस्कारर्थींचे अभिनंदन करून भविष्यातही त्यांच्या हातून उत्तम समाज कार्य घडेल असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमा दरम्यान सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, ५० हजार रुपयांचा धनादेश, शाल, पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप देण्यात आले. यावेळी दोन्ही मान्यवरांनी नम्रपणे पुरस्कार स्वीकारल्यानंतर पुरस्काराच्या रकमेत आपल्याकडून तेवढ्याच रकमेची भर घालून हा निधी सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांसाठी संस्थेकडे सुपूर्द केला.

यावेळी बोलताना मंत्री डॉ. भारती पवार म्हणाल्या की, सार्वजनिक वाचनालय या राज्यातील सर्वात जुन्या संस्थेकडून मिळालेला पुरस्कार विशेष गौरवाचा आहे. पुरस्कार मिळाला की, अजून चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. पुस्तकांचे वाचन करण्याचे वेगळे महत्त्व आहे. आजच्या पिढीने वाचन करणे गरजेचे असून वाचन संस्कृतीसाठी सार्वजनिक वाचनालयाने विविध उपक्रम चालू केले आहेत. सार्वजनिक वाचनालयाला सीएसआर फंडाच्या माध्यमातून आपण मदत करू. वाचनालयाने विद्यार्थिनींसाठी खास अभ्यासिकेची निर्मिती करावी अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाला आ. राहुल ढिकले, आ. सिमा हिरे, दिलीप फडके, वैद्य विक्रांत जाधव, सुनील कुटे, अभिजीत बगदे, देवदत्त जोशी, जयेश बर्वे, गिरीश नातू, जयप्रकाश जातेगावकर, संजय करंजकर, सुरेश गायधनी, प्रेरणा बेळे, शोभाताई नेर्लीकर, प्रशांत जाधव, धर्माजी बोडके, सोमनाथ मुठाळ, मंगेश मालपाठक, प्रशांत जुन्नरे, दीपक खैरनार, विकास देशमुख, रमेश थोरात, हेमंत रावले, यतीन पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

प्रतापपुर येथे वक्तृत्व स्पर्धा विजेत्या मुलामुलींचा ट्रॉफी व प्रमाणपत्र देवून गौरव

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

वृत्त मातोश्री गुंताबाई आखाडे बहुउद्देशिय संस्था, धुळे व नेहरू युवा केंद्र, धुळे यांचे संयुक्त विद्यमाने काटवान माध्यमिक विद्यालय, प्रतापपुर, ता. साक्री, जि. धुळे येथे वक्तृत्व स्पर्धा विजेते मुले-मुली यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. अशोककुमार मेघवाल साहेब, जिल्हा युवा अधिकारी, नेहरू युवा केंद्र, धुळे, जगन्नाथ वानखेडकर, मुख्य समन्वयक, जिल्हा महिला आर्थिक विकास महामंडळ, धुळे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पुजन केले.

कार्यक्रमात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावर आधारीत वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यावेळी १० मुलांनी भाषणे केली. त्यापैकी प्रथम कु. नंदिनी दिलीप कुवर इयत्ता ९वी, व्दितीय कु. माहेश्वरी नितीन गांगुर्डे इयत्ता ९वी, तृतीय कु. श्रध्दा जितेश भावसार इयत्ता ७वी यांनी पारितोषिके पटकावली. तसेच भारतीय संविधानावर आधारित संविधानिक उपाययोजनेचा हक्क या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतील पहिल्या तीन मुला-मुलींना अशोककुमार मेघवाल साहेब व मा. जगन्नाथ वानखेडकर यांचे हस्ते प्रथम हर्षल खंडेराव जाधव इयत्ता ७वी, व्दितीय कु. अक्षरा दादा पवार इयत्ता ९वी, तृतीय कु.नंदिनी दिलीप कुवर इयत्ता ९वी यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमास डॉ.डी.एम. आखाडे अध्यक्ष-मातोश्री गुंताबाई आखाडे बहुउद्देशिय संस्था, धुळे, राजेंद्रकुमार माळी अध्यक्ष-ममताई गोशाळा, म्हसाळे, ता. साक्री, जितेंद्र गांगुर्डे अध्यक्ष-जय भद्रा बहुउद्देशिय संस्था, प्रतापपुर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

नाशिक । लासलगाव-विंचूर रस्त्यावरील मंजुळा पॅलेसजवळ दुचाकीस्वारास ट्रकने पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाला. हवालदार रामदास घुमरे तपास करीत आहेत. धारणगाव खडक येथील राहुल सुधाकर कानमहाले (वय ३१) दुचाकीवरून (एमएच १५, एफडब्ल्यू ४७६१) लासलगावकडून विंचूरकडे जात होता. मंजुळा पॅलेसजवळ पाठीमागून येत असलेल्या ट्रकने (एमएच १८, एडी ५७६०) दुचाकीला जोरदार धडक दिली. करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे.

हुतात्मा दिनानिमित्त जिल्हा परिषद कार्यालयात मौन बाळगत अभिवादन

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

हुतात्मा दिनानिमित्त शहरातील जिल्हा परिषद कार्यालयात देशातील महान हुतात्म्यांना श्रद्धांजली देण्याचा इशारा देत सकाळी १०.५९ ला सायरन वाजून २ मिनिटे मौन ठेवत अभिवादन करण्यात आले.

नागरी संरक्षणचे मनोहर जगताप विभागीय क्षेत्ररक्षक, रविंद्र परदेशी जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पांडुरंग वाजे सायरन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. नागरी संरक्षणचे उपनियंत्रक सुधाकर सूर्यवंशी, सहाययक उपनियंत्रक देवेंद्र बावसकर, अतुल जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सायरन वाजवण्यात आली.

धोकेदायक वृक्षांबाबत सर्वंकष धोरण जाहीर करा, निष्पापांचे जीव वाचवा

छावा माजी नगरसेविका प्रा.डॉ.वर्षा भालेराव यांचे मनपा आयुक्तांना साकडे

नाशिक । लक्ष महाराष्ट्र वृत्त

नाशिक महापालिका हद्दीत रस्त्यांच्या मधोमध असलेले आणि अपघातांना निमंत्रण देणाऱ्या धोकेदायक वृक्षांबाबत सर्वंकष असे धोरण निश्चित करावे, अशा आशयाचे निवेदन नाशिक मनपाच्या माजी नगरसेविका, वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य व भाजपच्या महानगर उपाध्यक्षा प्रा.डॉ.वर्षा भालेराव यांनी आयुक्त डॉ.अशोक करंजकर यांना दिले आहे.

नाशिक महापालिका हद्दीतील रस्त्यांच्या मधोमध असलेल्या अनेक धोकेदायक वृक्षांमुळे छोटे मोठे अपघात होऊन त्यात काही निष्पापांचे बळी गेले आहेत. नाशिक महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण समितीची सदस्य नात्याने प्राधिकरणाच्या बैठकांमध्ये हा मुद्दा मी सातत्याने उपस्थित केला होता आणि याबाबत निर्णयही झाला होता. वड, पिंपळ, मोह यासारख्या दुर्मिळ प्रजातींच्या वृक्षांचे प्रत्यारोपण करण्यासंदर्भातही निर्णय झाला होता. पण त्याची पुढे काहीही कार्यवाही न झाल्याने आश्चर्य वाटते. पूर्वी शहरातील रस्ते छोटे आणि रुंद असताना रस्त्यांच्या कडेला असणारी अनेक झाडे रुंदीकरणानंतर रस्त्यांच्या अगदी मधोमध आली आहेत. गंगापूर रोड, पेठरोड, दिंडोरीरोड, इंदिरानगर, नाशिक-पुणे रोड अशा अनेक वर्दळीच्या रस्त्यांच्या मधोमध ही झाडे आहेत.

वाहन चालकांना बऱ्याचदा या वृक्षांचा अंदाज येत नाही आणि त्यामुळे अनेक छोटे-मोठे अपघात सातत्याने होत असतात. त्यात काही निष्पाप नागरिकांचे बळी गेले तर काही कायमचे जायबंदी झाले आहेत. पोलीस स्टेशनमध्ये याच्या नोंदी आहेत. आयुक्त आपण सध्या मनपा प्रशासनाचे सर्वे सर्वा आणि वृक्ष प्राधिकरण समितीचे अध्यक्षही आहात. आपण तात्काळ याबाबत काहीतरी धोरण निश्चित करावे आणि या वृक्षांच्या बाबतीत तातडीने निर्णय घेऊन शहरातील नागरिकांना दिलासा द्यावा, अशी आपणास कळकळीची विनंती असल्याचेही प्रा.वर्षा भालेराव यांनी निवेदनात पुढे नमूद केले आहे.

जाहीर नोटीस

मे. तहसिदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी साक्री यांचे न्यायालयात

तहसिल कार्यालय. साक्री
जन्म/मृत्यू नोंद र. क्र.३१/२०२४

श्री दशरथ महादु भदाणे
रा. मातोश्री ७. सुयोग साक्री ता. साक्री जि.धुळे ....**अर्जदार**
।। विरुध्द ।।
निबंधक जन्म - मृत्यु,
तथा
मुख्याधिकारी, नगर पंचायत साक्री,
ता. साक्री जि.धुळे .....**जाबदेणार**
(कै. सुंदरबाई महादु भदाणे यांची मृत्यू दि. ०१/१०/१९९८)

ज्याअर्थी अर्जदाराने दि.२२/१२/२०२३ रोजी अर्ज नं.३१/२०२३ चा अर्ज दाखल केलेला ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे कै.सुंदरबाई महादु भदाणे याची मृत्यू नोंद करणेबाबत साक्री येथील मे. तहसिलदार सो. यांचे कार्यालयात अर्ज केला आहे.

त्याअर्थी मे, तहसिलदार साक्री पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता, पुढील दि. १२/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० सुनावणी ठेवण्यात आली आहे. त्याअर्थी तमाम हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील मे. तहसिलदार सो. यांचे कार्यालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे. तहसिलदार यांनी दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही, तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर जाहिर नोटीस साक्री येथिल मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साक्री यांचे सही व शिक्यानिशी दि.२३/०१/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

शिक्का **कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साक्री**

जाहीर नोटीस

तहसिल कार्यालय. साक्री
जन्म/मृत्यू नोंद र. क्र.५१/२०२४

श्री. रियाज रोशन तांबोळी
रा. दिघावे ता. साक्री जि. धुळे ....**अर्जदार**
।। विरुध्द ।।
निबंधक जन्म - मृत्यु,
तथा
ग्रामसेवक ग्रामपंचायत दिघावे
ता. साक्री जि.धुळे .....**जाबदेणार**
(रियाज रोशन तांबोळी यांचा जन्म दि.१०/१०/१९९०)

ज्याअर्थी अर्जदाराने दि. ०४/०१/२०२४ रोजी अर्ज नं. ५१ / २०२४ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे रियाज रोशन तांबोळी यांची जन्म नोंद करणेबाबत साक्री येथील मे. तहसिलदार सोा. यांचे कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. तहसिलदार साक्री पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता, पुढील चौकशी दि. २६/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० सुनावणी ठेवण्यात आली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीताना कळविण्यात येते की, याबाबत काही बाद असल्यास साक्री येथील मे. तहसिलदार सो. यांचे कार्यालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित नहरकत नोंदवादी त्याअर्थी मे.तहसिलदार यांनी दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर जाहिर नोटीस साक्री येथिल मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साक्री यांचे सही व शिक्यानिशी दि.३०/०१/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

शिक्का **कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साक्री**

जाहीर नोटीस

तहसिल कार्यालय. साक्री
जन्म/मृत्यू नोंद र. क्र.३३/२०२४

१. श्री. कन्हैयालाल सुकलाल निकुंभे
२. चि. भटू मधुकर पाटील
रा. उंभड (व) ता. साक्री जि. धुळे ....**अर्जदार**
।। विरुध्द ।।
निबंधक जन्म - मृत्यु,
तथा
ग्रामसेवक, ग्रामपंचायत उंभड / दगडी विहीर
ता. साक्री जि.धुळे .....**जाबदेणार**
(भटू मधुकर पाटील यांची जन्म नोंद दि.०३/०६/२००६)

ज्याअर्थी अर्जदाराने दि.१५/१२/२०२३ रोजी अर्ज नं.३३ / २०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे भटू मधुकर पाटील याची जन्म नोंद करणेबाबत साक्री येथील मे. तहसिलदार सो. यांचे कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. तहसिलदार साक्री पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता, पुढील चौकशी दि. १२/२/२०२४ रोजी सकाळी ११.०० सुनावणी ठेवण्यात आली आहे. त्याअर्थी तनान जनतेस. हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीताना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास साक्री येथील मे. तहसिलदार सो. यांचे कार्यालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे.तहसिलदार यांनी दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यत कोणाचीही काहीही हरकत आली नाही. तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर जाहिर नोटीस साक्री येथिल मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साक्री यांचे सही व शिक्यानिशी दि. २३/०१/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

शिक्का **कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साक्री**

प्रोसेस जमा **ॲड. अलका मासुळे, धुळे**
नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. व.स्तर यांचे कोर्टात

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४९/२०२४

अनुसयाबाई शंकर गवळी, वगैरे २ ....**अर्जदार**
।। विरुध्द ।।
कोणीही नाही ...**जाबदेणार**
कै. शंकर रोडमल गवळी .....**मयत**

ज्याअर्थी दि.२२/०१/२०२४ रोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार नं. १ ते ३ हे मयत कै. शंकर रोडमल गवळी यांचे कायदेशीर वारस आहेत. यासंदर्भात वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मिळावा म्हणून सदरचा अर्ज धुळे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता चौकशी तारीख ०१/०३/२०२४ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधितांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही वाद, हरकत असल्याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सोा. कमांक १... यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन तकार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदरकामी कोणाचीही, काहीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर तकारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. न्यायालयाच्या सही-शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.
धुळे
दिनांक : ३०/०१/२०२४ आदेशावरुन
शिक्का
कनिष्ठ लिपीक **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, धुळे **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे**

ॲड. राकेश मोरे
नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. धुळे यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १७७/२०२४

आयेश बी सिराज अहमद मोमीन ....**अर्जदार**
।। विरुध्द ।।
कोणीही नाही ...**सामनेवाला**
अब्दुल कादीर सिराज अहमद मोमीन मृत्यु दिनांक-१५/०९/२०१८
मृत्युसमयी पत्ता:- ऐंशी फुटी रोड, मुनसिपल कॉलनी, झोपडपट्टी, धुळे, ता. जि. धुळे .....**मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. सो. धुळे यांचे कडे दि.२४/१/२०२४ रोजी कि. दि. अर्ज. नं. १७७/२०२४ चा अर्ज मयत अब्दुल कादीर सिराज अहमद मोमीन यांचे कायदेशीर वारस आहेत. असा वारस दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.२९/०२/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ८ सोा. धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या .....कोणतीही दखल घेतली जाणार नाही.
स्थळ-धुळे
दिनांक :- २९/१/२०२४ आदेशावरुन
शिक्का
कामगीरी कारकुन **अधिक्षक**
दिवाणी न्यायाधिश सो.व.स्तर, धुळे **दिवाणी न्यायाधिश सो.व.स्तर, धुळे**

ॲड. पंकज बी. पोतदार
नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठ स्तर) सो. यांचे न्यायालयात

दिवाणी कि. अर्ज नं. १५७/ २०२४

१) सुनिल बुधा देवरे उ.व.-३६ वर्षे, धंदा- नोकरी
२) संदिप बुधा देवरे उ.व.-३४ वर्षे, धंदा-वायरमन
नं. १ व २ रा. खंडलाय बु. ता. जि. धुळे
३) उषा संजय आल्होर उ.व.-४० वर्षे, धंदा- घरकाम
रा. जय महालक्ष्मी चौक, आर्वी, ता. जि. धुळे ....**अर्जदार**
।। विरुध्द ।।
कुणीही नाही ...**सामनेवाला**
कै. बुधा माणिक देवरे मृत्यु दि. ०१/०४/२०१९
मृत्यु ठिकाण: खंडलाय बु., ता. जि. धुळे .....**मयत**

भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारसा दाखला मिळणे करीता अर्ज

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. बुधा माणिक देवरे यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकरीता भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि. कि. अर्ज धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (व. स्तर) कोर्ट नं. यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता चौ. ता. दि. ०६/०३ /२०२४ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) कोर्ट नं. ८ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तक्रार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. बुधा माणिक देवरे यांचे कायदेशिर वारस म्हणुन भारतीय वारसा कायदा कलम ३७२ अन्वये वारस दाखला देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.
स्थळ : धुळे
दि. २९/०१/२०२४
शिक्का
व.लिपीक **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, धुळे **दिवाणी न्यायालय, धुळे**

ॲड. पंकजकुमार बी. पोतदार, धुळे
नि.६

जाहीर नोटीस

धुळे येथील मे.२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) सो. यांचे कोर्टात

दिवाणी कि. अर्ज नं. १३९ / २०२४

१) हिराबाई छोटु शिंदे उ.व.-४१, धंदा-मजुरी
रा. मु.पो. देऊर बु., ता.जि. धुळे ४२४३०२
२) शांताबाई विलास भिल उ.व.-२९, धंदा- मजुरी
रा. मु. पो. शिरधाने प्र. डांगरी, ता.जि. धुळे ४२४३१८
३) मिराबाई गोटु भिल उ.व.-३२, धंदा- मजुरी
रा. मु.पो. देऊर बु., ता.जि. धुळे ४२४३०२
४) गुंताबाई सजन मालचे उ.व.-२६, धंदा- मजुरी
रा. मु. कावठी, पो. प्र. मेहेरगाव, ता. जि. धुळे ४२४००२
५) कलाबाई गोरख भिल उ.व.-७२, धंदा- घरकाम
रा. वरची भिलाटी, मु. देऊर बु., ता.जि. धुळे ४२४३०२
६) विमल मंगा माळीच उ.व.-५६, धंदा- मजुरी
रा. मु. पो. नवलाणे प्र. मेहेरगाव, ता.जि. धुळे ४२४००२
७) लक्ष्मीबाई नाना भिल उ.व.-५२, धंदा- मजुरी
रा. शिरधाने प्र. डांगरी, ता.जि. धुळे ....**अर्जदार**
।। विरुध्द ।।
कुणीही नाही ...**सामनेवाला**
कै. धना गणा भिल .....**मयत**

बॉम्बे रेग्युलेशन कायदा तखखख १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकरीता अर्ज

ज्याअर्थी मयत कै. धना गणा भिल हे दि. १४/०७/१९८९ रोजी मौजे नवलाणे, पो. मेहरेगाव, ता. जि. धुळे येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र. १ ते ७ हे सदर मयतांचे कायदेशिर अग्रहक्की वारस आहेत. त्याबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी, अर्जदारांच्या सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत, विरोध किंवा आक्षेप असल्यास अगर अर्जदारांव्यतिरीक्त मयताचे कुणीही इतर वारस असल्यास दि. ०२/०३/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मे कोर्टात स्वतः अगर वकीलांमार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे.

सदर तारखेस कोणीही हजर न राहील्यास कोणाचेही काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरून अर्जदारांचा वारस दाखला मिळणेसाठीच्या सदर अर्जाचे कामी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस असे.
धुळे
२९/०१/२०२४
शिक्का
व.लिपीक **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, धुळे **दिवाणी न्यायालय, धुळे**

न्यूज कॉलम

जिल्हा पोलिस दलातर्फे आज पुरस्कार वितरण सोहळा

धुळे । मराठी पत्रकार दिनानिमित्त जिल्हा पोलिस दलातर्फे पत्रकार बांधवांना बाळशास्त्री जाभेंकर पुरस्कार २०२३ चे वितरण करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम उद्या दि. १ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता स्टेशन रोडवरील हॉटेल ऋतुराज येथे होणार आहे. पत्रकार बांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे व सहाय्यक पोलिस अधिक्षक तथा धुळे शहरचे उपविभागीय पोलिस अधिकारी एस. ऋषिकेश रेड्डी यांनी केले आहे.

आयनेत शेतकऱ्याचे लाखाचे साहित्य लंपास

धुळे । आयने (ता. साक्री) शिवारातील शेतातून चोरट्यांनी रोटावेटर, सौर प्लेटांसह एक लाखाचे साहित्य लंपास केले. मंगलसिंग रामसिंग गिरासे (रा. आयने) या शेतकऱ्याच्या तक्रारीनुसार त्यांच्या शेतातून २७ ते २८ जानेवारीदरम्यान चोरट्याने सोलर प्लेट, केबल व पाइप, रोटाव्हेटर, टिलर व बैलगाडीचे चाक असे एकूण एक लाख पाच हजारांचे साहित्य नेले. त्यानुसार निजामपूर पोलिस ठाण्यात घटनेची नोंद झाली.

बनावट कागदपत्रांद्वारे शासनाची तब्बल २१ लाखांची फसवणूक

उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर संबंधितांविरुध्द फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

उद्योग थाटण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राकडे एका बहाद्दराने बनावट कागदपत्रांच्या आधारे प्रस्ताव सादर केला. त्यानुसार शासनाकडून तब्बल २१ लाख ७६ हजारांचे सवलतीत (सबसीडी) विशेष भांडवली अनुदान प्राप्त करुन घेतले. शिवाय उद्योगही सुरु तर केलाच नाही पण उद्योगासाठी दाखविलेली जागाही विक्री करुन टाकली. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर या गंभीर बाबीचा भांडाफोड झाला. अखेर उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर संबंधितांविरुध्द शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी निंबाजी पितांबर पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ए.पी.आयकॉन टेक्सटाईल्स या उद्योगासाठी जिल्हा उद्योग केंद्राकडे शकील अहमद अकील अली अन्सारी रा. मुस्लिम नगर, वडजाई रोड, धुळे यांनी प्रस्ताव दि. ३० जून २००६ रोजी सादर केला होता. उद्योगाचे ठिकाण प्लॉट नं.६ मुस्लीम नगर सर्व्हे. नं.४४५/१ वडजाई रोड, धुळे असे दिले. कागदपत्र अपूर्ण असल्याने शकील अन्सारी यांना कागदपत्रांची पुर्तता करण्याबाबत सुचित

करण्यात आले. त्यानुसार दि.२६ जून २०१० रोजी पात्रता प्रमाणपत्र देऊन शासनाने विशेष भांडवली अनुदान अर्थात सबसिडी २१ लाख ७६ हजार एवढ्या रक्कमला मंजूरी दिली.

अर्जदाराच्या बँक खात्यात सबसिडीची रक्कम वर्ग करण्यात आली. त्यानंतर दि.१९ जून २०१२ रोजी मुस्लीम नगरातील शेक शकील शेख इब्राहिम यांनी तक्रार अर्ज दाखल केला. त्यात ए.पी. आयकॉन टेक्सटाईल्स या उद्योजकाने सबसिडी प्राप्त करण्यासाठी दुसरीच जागा दाखविली. विद्युत वितरण कंपनीचे कोटेशन, पैसे भरल्याची पावती, मनपातील नगररचना विभाग यांच्याकडील बिल्डींग प्लॅन मंजूरीचे बनावट कागदपत्र सादर केल्याचे नमूद केले.

यासंदर्भात जिल्हा उद्योग केंद्राने विद्युत वितरण, मनपातील नगररचना विभाग, धुळे शहर तलाठी यांच्याशी पत्रव्यवहार करून माहिती मिळविली असता. ए.पी. आयकॉन टेक्सटाईल्सचे प्रोप्रायटर शकील अहमद अकील अली अन्सारी यांना कोणीही कागदपत्र दिले नसल्याच उघडकीस आले. व तलाठी धुळे यांचे कडून मिळालेल्या माहितीनुसार उद्योगासाठी असलेली जागा शकील अहमद अकील अली अन्सारी यांनी चंद्रकांत पंडीत चव्हाण यांना विक्री केल्याचे समजले. दिलेल्या जागेवर उद्योग नसल्याचे निष्पन्न झाल्याने जिल्हा उद्योग केंद्राने सबसिडीचे २१ लाख ७६ हजार शासनाकडे जमा करण्याबाबत लेखी कळवले. रक्कम परत घेण्याची कारवाई सुरू असताना तक्रारदार शेख शकील शेख इब्राहीम यांनी उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका १२७/२०१३ दाखल केली. याप्रकरणी उच्च न्यायालयात कामकाज होऊन योग्य ती कारवाई करण्याचे आदेश न्यायाधीशांनी १७ सप्टेबर २०१४ रोजी जिल्हाधिकारी, अपर तहसिलदार यांना दिले. तर आठ महिन्यांपुर्वी नाशिक येथील उद्योग सहसंचालक यांनी देखील एफआयआर दाखल करण्याबाबत आदेशित केले होते. अखेर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दि.३० जानेवारी २०२४ रोजी धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उद्योग सुरू न करता बनावट कागदपत्र सादर करून नियोजनबध्द पध्दतीने कटकारस्थान रचून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी शकील अहमद अकील अली याच्याविरुध्द भादंवि कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, १२० (ब) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेल्या मूकनायक वर्तमानपत्राचा वर्धापनदिन पत्रकार भवनात साजरा

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

सन १९२० साली भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१ जानेवारीच्या दिवशी मूकनायक वर्तमानपत्र सुरु केले होते. यामूकनायक वर्तमानपत्राचा वर्धापन दिन ३१ जानेवारी रोजी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे साजरा करण्यात आला. पत्रकार संघाच्या पत्रकार भवनात पत्रकार रवी नगराळे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा सांजदैनिक खान्देश मैदानचे संपादक मनोज गर्दे, उपाध्यक्ष तथा सांजदैनिक श्रमराज्यचे संपादक अतुल पाटील, साप्ताहिक सम्यक विचारचे संपादक तथा पत्रकारिता अभ्यासक्रमाचे अध्यापक प्रा. मोहन मोरे, सांजदैनिक गरुड सम्राटचे संपादक पुरुषोत्तम गरुड, जेष्ठ पत्रकार तथा दैनिक व्यंगनगरीचे संपादक राजेंद्र सोनार, स्वाभिमानी टीव्ही वृत्तवाहिनीचे संपादक प्रकाश शिरसाठ, धुळे टीव्ही वृत्तवाहिनीचे सिनिअर विडिओ जर्नालिस्ट निलेश परदेशी, दैनिक दिव्य मराठीचे प्रेस फोटोग्राफर वीरेंद्र मोरे, दैनिक लक्ष महाराष्ट्रचे मुख्य उपसंपादक पुरुषोत्तम पाटील, ईटीव्हीव्ही भारतचे धुळे जिल्हा प्रतिनिधी तथा नंबर वन महाराष्ट्र न्युज पोर्टलचे संपादक सुनील बैसाने, खान्देश मैदानचे उपसंपादक मनोहर सोलंकी, दैनिक नवराज्यचे प्रतिनिधी चंदू पाटील, जमील शाह, ग्रेट हिंदुस्तानचे संपादक अनिस खाटीक, पत्रकार राकेश गाळणकर, दैनिक आधुनिक केसरीचे जिल्हा प्रतिनिधी आकाश उर्फ सनी सोनवणे, दैनिक स्वतंत्र भारतचे मुख्य उपसंपादक पंकज पाटील, गरुड सम्राटचे अजिंक्य देवरे, दैनिक पोलीस शोधचे वाल्मिक पाटील, दैनिक दे दणकाचे उपसंपादक दिनेश निकुंभ, दैनिक ए वन न्यूजचे मुख्य उपसंपादक दीपक शिंदे, धुळे एक्सप्रेस न्यूजचे संपादक शांताराम अहिरे, पत्रकार भावांचे कार्यालयीन अधीक्षक सुभाष वाघ यांच्यासह धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी आणि मान्यवर पत्रकार बांधव उपस्थित होते.

हाडाखेड चेक पोस्टवर वाहनासह २३ लाखाचा गुटखा जप्त

होळनांथे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

शिरपूर तालुका पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार हाडाखेड सीमा तपासणी नाक्यावर परराज्यातून गुटखा विक्रीच्या उद्देशाने वाहतूक करत असलेल्या वाहनावर पोलिसांनी कारवाई करत २३ लाखांचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, पोलीस निरिक्षक श्रीराम पवार यांना गुप्त बातमीदारांमार्फत मिळालेल्या बातमीच्या आधारे, सेंधव्याहुन शिरपुर कडे एक ट्रक महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेली सुगंधित तंबाखू भरुन महाराष्ट्र राज्यात पुरवठा करण्यासाठी वाहतुक करीत असलेल्या वाहनावर हाडाखेड सीमा तपासणी नाक्यावर सापळा रचून दिनांक ३० जानेवारी रोजी सकाळी ०६ : ३० वाजेच्या सुमारास कारवाई केली. यात चालक १) सहाम मुनीजर (वय ३२) क्लीनर विलाल फजरखान, (वय २७) दोन्ही रा. फिरोजपुर ता. पुनहाना जि. नुह राज्य हरियाणा यांच्या वाहनात तंबाखू सदृश्य पदार्थ असल्याच्या संशय आल्याने, त्यांना वाहनात काय आहे असे विचारले असता त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिले. याबाबत पोलिसांना संशय आल्याने त्यांनी वाहन पोलीस स्टेशनला आणून पंचासक्षम वाहनाची तपासणी केली असता त्यातून ४ लाख ७० हजार ४०० रुपये किंमतीची अराधना छाप नावाची सुगंधित तंबाखू तसेच ३ लाख ९६ हजार ८०० रुपये किमतीची प्रिमीयम रत्ना छाप नावाची सुगंधित तंबाखू तर १५,००,००० किंमतीचा १० चाकी अशोक लेलैंड कंपनीचा ट्रक असा २३ लाख ६७ हजार २०० चा मुद्देमाल जप्त करून गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, शिरपुर उपविभागीय पोलीस अधिकारी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक श्रीराम पवार, रफिक मुल्ला, संदिप ठाकरे, संतोष पाटील, योगेश मोरे, स्वप्नील बांगर, संजय भोई, कृष्णा पावरा यांनी केली.

सांगवी पोलिसांची कारवाई

राष्ट्रभाषा हिंदी परीक्षेत लेखणी बागुल विशेष योग्यता श्रेणीत यशस्वी

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

राष्ट्रभाषा हिंदी परीक्षेत जिजामाता कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले आहे. राष्ट्रभाषा सभा पुणे आयोजित विविध परीक्षांमध्ये जिजामाता कन्या विद्यालयाच्या इ.५ वी ते ९ वी च्या एकूण ९० विद्यार्थिनी प्रविष्ट झाल्या होत्या.

सदर परीक्षेचा निकाल राष्ट्रभाषा सभा पुणे विभागाकडून निकाल नुकताच जाहीर झाला. सर्व विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून इ.५ वी 'क' ची विद्यार्थिनी कु.लेखणी सचिन बागुल ही विशेष योग्यता श्रेणी घेऊन तर ३९ विद्यार्थिनी याप्रथम श्रेणी त उत्तीर्ण झाल्या आहेत. प्रविष्ट विद्यार्थिनींना हिंदी विषय अध्यापक आर.डी.पाटील, मगर सर, संदीप जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे प्राचार्या सौ.अपर्णा पाटील, सर्व शिक्षक -शिक्षकेतर बंधूभगिनींनी कौतुक करून अभिनंदन केले.

वरुळ येथे आनंद मेळावा उत्साहात

शिरपूर। लक्ष महाराष्ट्र वृत्त

तालुक्यातील वरुळ येथील आर. सी.पटेल इंग्लिश स्कूल मध्ये आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. त्यात शाळेतील सर्व विद्यार्थी, त्यांचे पालक व पंचक्रोशीतील नागरिकांनी देखील उत्साहाने सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासाबरोबरच इतर पूरक गोष्टी देखील महत्वाच्या असतात. तसेच त्यांना आर्थिक बाबतीत साक्षर बनवण्यासाठी शाळेत विद्यार्थ्यांसाठी आनंद मेळावा चे आयोजन शाळेकडून करण्यात आले. त्यात विविध चविष्ट खाद्य पदार्थांचे स्टॉल तसेच विविध नावीन्यपूर्ण खेळ, टॅटू मेकिंग इ. उपक्रम देखील आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे सर्वात महत्वाचे आकर्षण ठरले जादूचे खेळ.

कार्यक्रमाची सुरुवात ज्येष्ठ पालक व गावातील मानकरी यांच्या हाताने फित कापून तसेच सरस्वती पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे सीईओ डॉ. उमेश शर्मा, मुख्याध्यापिका श्रीमती सपना मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

'बेटी बचाव बेटी पढाव' हे कार्य पुढे न्यावे : सारिका रंधे

संत गाडगे महाराज सांस्कृतिक मंडळातर्फे हळदीकुंक

धुळे । प्रतिनिधी

राजमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य प्रेरणादायी असून त्यांच्यामुळेच आज महिलांनी विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. महिलांनी बेटी बचाव बेटी पढाव हे कार्य पुढे नेले पाहिजे. स्त्रीशक्ती महान आहे. प्रत्येक महिला जगदंबाचे स्वरूप असते. त्या सुप्त स्वरूपाला जागृत करणाचा प्रयत्न महिलांनी केला पाहिजे, असे प्रतिपादन शिरपूर ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्य सौ.सारिका रंधे यांनी केले.

देवपूरातील संत गाडगे महाराज सांस्कृतिक मंडळातर्फे खान्देश कुलस्वामिनी श्री.एकविरा देवी मंदिराजवळील संत गाडगे महाराज मठात तिळगुळ वाटप व हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थान जि.प.सदस्या शालिनीताई बाळासाहेब भदाणे यांनी भुषविले. कार्यक्रमाचे उद्घाटन सौ.सारिका रंधे यांच्या हस्ते झाले. यावेळी मनपाच्या महिला बालकल्याण समितीच्या माजी सभापती सौ. सारिकाताई अग्रवाल, भाजपा ओबीसी महिला मोर्चाच्या उपप्रदेशाध्यक्षा मायादेवी परदेशी, सामाजिक कार्यकर्त्या रत्नाताई शिंदे आदी व्यासपिठावर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संत गाडगे महाराज सांस्कृतिक मंडळाच्या महिला अध्यक्ष रेखाताई गवळी, उपाध्यक्षा कल्पना निकम, सचिव गायत्री सगरे, सहसचिव शोभा निकम, मनिषा सगरे, धनश्री पाराटे, सुप्रिया गायकवाड, रोहिणी सगरे, अलका सगरे, जयश्री गवळी, सविता आगजाळे, प्रियंका वाघ, लता शिरसाट, संगीता गवळी, मनीषा गायकवाड, प्रज्ञा जाधव, विजया जाधव, सुमन जाधव, जनाबाई सागर, करुणा आगजाळे, रत्ना गवळी, कविता गायकवाड, मीना शिंदे, सारिका जाधव, दीपाली आघाडे आदींनी परिश्रम घेतले.

विधानसभास्तरीय मास्टर ट्रेनरचे एक दिवसीय प्रशिक्षण संपन्न

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात विधानसभास्तरीय मास्टर ट्रेनरचे प्रशिक्षण संपन्न झाले.

या प्रशिक्षणास निवासी उपजिल्हाधिकारी नितिन गावंडे, मनपा उपायुक्त संगिता नांदुरकर,उप मुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, गणेश मोरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गंगाराम तळपाडे, महेश जमदाडे, संदीप पाटील, सुरेखा चव्हाण, जिल्हा पुरवठा अधिकारी महेश शेलार, जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके, तहसिलदार आशा गांगुर्डे, नगरपालिका प्रशासन अधिकारी शिल्पा नाईक, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी महेश खडसे, जिल्हा परिषदेचे उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी दिपक वाघ, उप जिल्हा पुरवठा अधिकारी मुकेश कांबळे,नायब तहसिलदार प्रविण बागुल यांच्यासह जिल्ह्यातील विधानसभास्तरीय मास्टर ट्रेनर उपस्थित होते.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी देशपांडे यांनी दिली मातोश्री वृद्धाश्रम व कुष्ठरोग आश्रमास भेट

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी डॉ. कै. दुगल स्मृति समिती, धुळे मातोश्री वृद्धाश्रम येथे जाऊन वृद्धाश्रमातील २२ आजी आजोबांना मतदान कार्डाचे वाटप केले. तसेच नवनिर्माण समाज सेवक संघ कुष्ठरोग आश्रमासही भेट दिली.

यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकांत धिवरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गंगाराम तळपाडे, नायब तहसिलदार राजु सोनार, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे शिल्प निदेशक तथा मास्टर ट्रेनर दिनेश सैदाणे, मातोश्री वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक धीरज धनगर, प्रशांत मोराणकर, कुष्ठरोग आश्रम व्यवस्थापक भरत पाठक, शैलेंद्र पाठक, सागर नेमाणे, मंडळ अधिकारी संतु शिरसाठ आदी उपस्थित होते. मुख्य निवडणूक अधिकारी

श्री.देशपांडे यांनी यावेळी मातोश्री वृद्धाश्रम, कुष्ठरोग आश्रमातील आजी, आजोबांशी चर्चा केली तसेच आगामी निवडणूकीसाठी मतदान करुन आपला मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन केले.

यावेळी त्यांच्या हस्ते मास्टर ट्रेनर दिनेश सैंदाणे यांच्या मतदान जनजागृतीच्या अतिउत्कृष्ठ कामाची दखल घेऊन चांगल्याप्रकारे काम केल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ देवून त्यांचे अभिनंदन केले.भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच १८ वर्ष पुर्ण करणाऱ्या नवमतदारांची मतदार नोंदणी व वंचितघटकांची नावनोंदणी करण्यासाठी विशेष नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेत शाळा, कॉलेज, महाविद्यालय, महिला, दिव्यांग बांधव, ज्येष्ठ नागरिक, घर नसलेल्या भटक्या व विमुक्त जमातीमधील व्यक्तीं, तृतीयपंथीय व्यक्ती आणि देहविक्री करणाऱ्या महिला, दुर्धर आजारग्रस्त नागरिक, व इतर वंचित घटक यांची विशेष करुन नाव नोंदणी करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी मतदार नोंदणी करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार उप जिल्हा निवडणूक अधिकारी,धुळे, धुळे शहर अपर तहसिलदार, तहसिल कार्यालय,धुळे यांच्या मार्गदर्शनाखाली मास्टर ट्रेनर दिनेश सैदाणे यांनी शासकीय कार्यालय, शाळा, कॉलेज, महाविद्यालय, दुर्धर आजारग्रस्त, दिव्यांग, तृतीयपंथीय, कुष्ठरोग आश्रम, वृद्धाश्रमात जाऊन मतदार जनजागृती शिबीराचे आयोजन केले होते.

देवरे अभियांत्रिकीत स्वच्छता अभियान संपन्न

धुळे । लक्ष महाराष्ट्र वृत्त

श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या बापूसाहेब शिवाजी राव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयात ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स् विभागात ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स् स्टुडंट्स असोसिएशन (ईटेसा) च्या वतीने अमृत महोत्सवी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विभागात महाविद्यालयातील मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमा नंतर स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ हितेंद्र पाटील व ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स विभाग प्रमुख प्रा डॉ पी एस पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनात ईलेक्ट्रॉनिक्स टेली कम्युनिकेशन्स स्टुडंट्स असोसिएशन (ईटेसा) व इन्स्टिटयूट इनोव्हेशन कौन्सिल (आय आय सी) च्या संयुक्त विद्यमाने हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. विभागातील दालने प्रयोग शाळा वर्ग खोल्या येथे स्वच्छतेचे काम पूर्ण केले. ईटेसा व आय आय सी समन्वयक प्रा विजय तवर व विभागातील सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी स्वच्छता अभियानाचे संयोजन केले.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक

गुरुवार दि. १ फेब्रुवारी २०२४ ५

एमईटी भुजबळ नॉलेज सिटीचा मेट बीकेसी उत्सव २४ अत्यंत उत्साहात संपन्न

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा आढावा घेणारी चित्रफीत ठरली विशेष आकर्षण



नाशिक

। यावर्षीचा मेट बीकेसी उत्सव हा आपल्या जीवनातील नवरसाबद्दल महत्व सांगणाऱ्या थीम वर आधारित होता. थिरकती तरुणाई, धगधगती रोषणाई पावरफुल परफॉर्मन्सेस, सुमधुर संगीत, रोमांच आणणारे गाण्यांचे कार्यक्रम, ग्रुप डान्स, अतिशय सुंदर असे गायन, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेणारी चित्रफीत ही विशेष आकर्षण ठरली. फॅशन शो, शिवभक्तांसाठी निर्भय असे म्हणजेच अघोरी शिवभक्तांचे शिवपार्वती वंदन, श्रीकृष्ण व प्रभू श्रीराम या देवतांचे महत्त्वाचे जीवनातील रस सांगणारे नृत्य, फॅशन शो, एमई.टी स्कूल ऑफ आर्किटेक्चर अँड इंटेरियर डिझाईनच्या विद्यार्थ्यांचा परफॉर्मन्स व मीना भुजबळ स्कूल ऑफ एक्सलन्स च्या बाळगोपाळांचे परफॉर्मन्स, नवरस या यानुसार विविध कार्यक्रम आखण्यात आले होते. त्याचबरोबर त्या महान चित्रपट व संगीत क्षेत्रातील कलाकारांना मागील काही वर्षांमध्ये विशेषतः मागील वर्षांमध्ये मुकलो त्यांना श्रद्धांजली ही त्यांचीच गाणी स्टेजवर परफॉर्म करून देण्यात आली.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक

सोनगीर येथील आनंदवन विद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

विद्यार्थ्यांनी जिंकले पालकांचे व रसिकांचे मने

सोनगीर । सोनगीर येथील आनंदवन बाल मंदिर
प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात दोन दिवसीय वार्षिक स्नेह संमेलन उत्सवात संपन्न येथील आनंदवन संस्थांमार्फत सालाबादप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रबोधन करणारे त्याचा कला गुणांना वाव देणारे असे उत्तम स्नेह संमेलन(गॅदरिंग)दि.३०,३१जानेवारी घेण्यात आले.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मठाधिपती प.पू.श्री. मुकुंदराज महाराज यांचा प्रेरणेने बलमंदिर मुख्याध्यापिका संगीता कासार, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापिका रेखा वाघ,प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रकाश शिंदे संस्थेचे व्यवस्थापक विकास कुंटे यांचा प्रमुख उपस्तिथीत कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. दोन दिवसीय संमेलनात ८६ विविध रंगबेरंगी सांस्कृतिक नाट्य,नृत्य, गायन विविध कार्यक्रम सादर केले. यात लक्षवेध कोळी नृत्य,पावरी नृत्य,पोवाडा,आदिवासी नृत्य,देशभक्ती नाट्य,सांबर गुन्हा(क्राईम),मोबाईल मूळे होणारी ऑनलाइन फसवणूक वर आधारित नाट्य असे जनागरुती करणारे कार्यक्रम सादर करण्यात आले.यात शिशु गट,मोठा गट,लहान गट,पहिली ते दहावी पर्यतचा सर्व विद्यार्थ्यांना विविध गट बनवून सामूहिक कार्यक्रमात सहभाग घेतला.कार्यक्रमाचे सूत्र संचालन पंकज जाधव यांनी केले.स्नेह संमेलनात पालक वर्गाने उत्स्फुर्त प्रतिसाद दिला असून मोठ्या संख्येत पालक ग्रामस्थ या स्नेह संमेलनास उपस्तीत होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.